# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२०

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### राजापूर तालुक्यातील शेतक-यांना पिकविम्याची रक्कम मिळण्याबाबत

**(१) ७३ (०७-०४-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचा पिकविमा उतरविला नसल्याने शेतकऱ्यांना शासनाच्या नुकसानभरपाईची प्रतिक्षा करावी लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांनी पिकविमा उतरविला असता तर प्रचलित दरानुसार प्रति हेक्टरी ४२ हजार ५०० रुपयांप्रमाणे राजापूर तालुक्यातील १७०० हेक्टरवरील पिकांसाठी ७ कोटी ३२ लाख ५० हजार रुपयांची भरपाई मिळाली असती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांची उदासिनता व कृषि विभागाकडून जनजागृती न झाल्याने पीकविमाच्या लाभापासून शेतक-यांना वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राजापूर तालुक्यातील शेतक-यांना पिकविमाची रक्कम तात्काळ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१२-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही

(२) हे खरे नाही

(३) हे खरे नाही.

कृषि विभागामार्फत तसेच विमा कंपनीमार्फत योजनेची प्रचार व प्रसिध्दी करणे साठी आवश्यक ती कार्यवाही हंगामापुर्वी करण्यात आली असून, उन्नत शेती : समृद्ध शेतकरी कार्यक्रम, दुरदर्शन, स्थानिक रेडिओ, स्थानिक वर्तमानपत्रे, शेतकरी मेळावे, प्रशिक्षण कार्यक्रम, गावोगावी प्रचार सभा इ. माध्यमातुन प्रसिदधी करण्यात आली आहे.

(४) राजापुर तालुक्यातील सहभागी ३५ शेतकरी अर्जदारांनी रक्कम रु.१७२३४/- विमा हप्ता भरुन १९.८१ हे. क्षेत्र संरक्षित केले आहे. त्यापैकी सर्व ३५ अर्जदार शेतकऱ्यांना रक्कम रु.१.४६ लक्ष नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरात हर्बल हुक्का पार्लरमध्ये अंमली पदार्थाचे सेवन होत असल्याबाबत**

**(२) ३३६ (२२-०३-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात हर्बल हुक्का पार्लरमध्ये मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थाचे सेवन होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हर्बल हुक्का पार्लरला परवानगी शासनाने दिली आहे काय, तसेच येथे अवैधरित्या अल्पवयीन मुलांना प्रवेश देऊन तंबाखुजन्य पदार्थांचा नियमबाह्य पुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संसदेत ई-सिगरेट हुक्क्याबद्दल विधयेक सादर केले आहे त्याबाबत महाराष्ट्र शासनाची भुमीका काय आहे,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून या हुक्का पार्लरवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२१-१०-२०२०) :** (१) नागपुर शहर पोलीस आायुक्तालयाअंतर्गत माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये २ हुक्का पार्लरवर छापा टाकण्यात आला आहे. सदर कारवाईमध्ये ४ आरोपींना अटक करण्यात आली असून अनधिकृत साहित्य जप्त करण्यात आले आहे.
(२) नागपुर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत कोणतेही हर्बल हुक्का पार्लर सुरु करण्याबाबत परवाना देण्यात आलेला नाही.

नागपुर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये हुक्का पार्लरवर केलेल्या कारवाईमध्ये अल्पवयीन मुले अंमली पदार्थाच्या व्यसनाधीन होत असल्याचे तसेच, अंमली पदार्थ विक्री होत असल्याचे आढळून आलेले नाही.

तथापि, प्राप्त तक्रारीनुसार तंबाखुजन्य पदार्थ वापरत असल्याचे निष्पन्न झाल्यास, अशा हुक्का पार्लरवर सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन,पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात येते.

(३) केंद्र शासनाने ई-सिगारेट निर्बंधांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरीता दिनांक १८/०९/१९ पासून लागु केलेली अधिसुचना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ३०/०९/२०१९ व दिनांक ०२/१२/२०१९ अन्वये, सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणुन दिली आहे.

(४) सन २०१९ व २०२० या वर्षामध्ये खालील प्रमाणे कोटपा अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार हुक्का पार्लरवर कार्यवाही करण्यात आली आहे.

| दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल किंमत |
|---|---|---|
| ३४ | ५८ | रु. १३,९६,४४१/- |
| १४ | २२ | रु. १,८९,१५९/- |

हर्बल हुक्का पार्लर चालविण्याबाबत आस्थापनाधारकांनी मा.उच्च न्यायालय येथे स्वतंत्रपणे याचिका दाखल केल्या होत्या. सदर याचिकांमध्ये मा.न्यायालयाने Soex हर्बल (तंबाखुविरहीत) या नावाच्या उत्पादनाचा वापर करुन हुक्का पार्लर सुरु ठेवण्याबाबत आदेश पारित केले आहेत. तसेच, सदर आदेशामध्ये, हुक्का पार्लरमध्ये गैरप्रकार आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्याबाबत पोलीसांना मुभा असेल, असे देखील नमुद करण्यात आले आहे.

सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ या कायद्यामध्ये दिनांक ०४/१०/२०१८ रोजी सुधारणा झाली असून याव्दारे राज्यात हुक्का पार्लरवर बंदी घालण्यात आली आहे. सदर कायद्यातील तरतुदीनुसार एक ते तीन वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाची तसेच, रुपये ५०,००० ते रुपये १,००,०००/- इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदपूर, चाकूर (जि.लातूर) या तालुक्यांतील सोयाबीन, कापूस, ज्वारी या पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिकविम्याची रक्कम देण्याबाबत**

**(३) ७५४ (०७-०४-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर, चाकूर (जि.लातूर) या तालुक्यांत सोयाबीन, कापूस, ज्वारी हि पिके मोठ्या प्रमाणात येत असून सोयाबीनला मोड फुटले, ज्वारी काळी पडली, वेचनीस आलेला कापूस पावसामुळे गळून पडल्यामुळे शेतकऱ्याचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १९ सप्टेंबरच्या अधिसूचनेमध्ये ज्वारी व कापसाचा समावेश करण्यात यावा तसेच सोयाबीन,कापूस,ज्वारीचा पीकविमा न भरलेल्या शेतकऱ्यांनाही नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी तेथील नागरिकांनी व संघटनांनी माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादम्यान चाकूर, तहसिलदार आणि उपविभागीय अधिकारीअहमदपूर यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अहमदपूर आणि चाकूर तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिकविम्याची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१२-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत अहमदपूर तालुक्यातील एकूण ८४८३४ शेतकरी अर्जदारांना रक्कम रु. ७५.२६ कोटी व चाकूर तालुक्यात एकूण ५११४०० शेतकरी अर्जदारांना रक्कम रु.७६.१५ कोटी नुकसान भरपाई रक्कम संबंधित विमा कंपनीमार्फत लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात अपघातग्रस्त शेतक-यांच्या नातेवाईकांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतंर्गत आर्थिक मदत देण्याबाबत

**(४) ८३२ (०७-०४-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात अपघातात मृत्यू झालेल्या शेतक-यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत मिळण्यासाठी शासनाने सुरु केलेल्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतंर्गत दोन वर्षातील चाळीस प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे शेतक-यांचे नातेवाईक आर्थिक मदतीच्या प्रतिक्षेत असुन प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने राजापूर तालुक्यात अपघातात मृत्यू झालेल्या शेतक-यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१२-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

राजापूर, जि.रत्नागिरी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत सन २०१७-१८ मध्ये एकूण ०२ विमा प्रस्ताव प्राप्त झाले होते. ते दोनही प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत.

तसेच सन २०१८-१९ मध्ये एकूण ०८ विमा प्रस्ताव प्राप्त झाले होते. यापैकी ०३ प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून सद्यस्थितीत विमा कंपनीकडे ०५ प्रस्ताव कागदपत्राच्या अभावी प्रलंबित आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

कागदपत्रांच्या पुर्ततेअभावी विमा प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(३) प्राप्त विमा प्रस्ताव शीघ्र गतीने मंजूर होण्यासाठी जिल्हा स्तरावर तसेच आयुक्तालय स्तरावर विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी यांच्या समवेत बैठक घेऊन सातत्याने विमा प्रकरणे निकाली काढण्यास्तव सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच त्याबाबत सातत्याने पाठपुरावा चालू आहे. तसेच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावर कागदपत्राच्या पुर्ततेसाठी कार्यवाहीत असलेल्या विमा प्रस्तावाची पुर्तता तात्काळ करुन घेऊन विमा कंपनीकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांना पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(५) ८९३ (०७-०४-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील शेतक-यांचे आधार क्रमांक अपलोड नसल्यामुळे अनेक शेतकरी पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेपासून वंचित राहिल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे एकाचे पैसे दुसऱ्याच्या खात्या वळते झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासानाने चौकशी करुन परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांना पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत दि. ०५.०९.२०२० अखेर परभणी जिल्ह्यातील एकुण ३,०८,९३५ लाभार्थ्याची नोंदणी झालेली आहे. त्यापैकी ३,०४,७४३ लाभार्थी यांचे आधारप्रमाणे पोर्टलवर नाव दुरुस्ती करण्यात आलेली असुन उर्वरित ४,१९२ लाभार्थी यांचे पोर्टलवरील नाव आधारप्रमाणे करण्याची दुरुस्ती संबधीत लाभार्थी यांनी करणे अपेक्षीत आहे.

(२) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत एकाचे पैसे दुसऱ्याच्या खात्यात वळते झाले असलेबाबत निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत जिल्हास्तरावर पात्र लाभार्थी यांचे आधार प्रमाणे दुरुस्ती करणेसाठी सर्व गावनिहाय नियुक्त नोडल अधिकारी यांना कालबध्द कार्यक्रम निश्चित करुन विशेष मोहिम राबवून सदरील काम पुर्ण करणेबाबत सुचित करण्यात आलेले

आहे. तसेच सदरील योजनेअंतर्गत रक्कमेचे हप्ते सुरळीत चालू राहण्यासाठी शेतकऱ्यांनी त्यांचे नाव जवळच्या सी.एस.सी. केंद्रामार्फत दुरुस्ती करुन घेण्याबाबत वेळोवेळी वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देण्यात आलेली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(६) १०७५ (०७-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात केंद्र पुरस्कृत पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी (पीएमकिसान) योजनेंतर्गत सुमारे ४ हजार ११६ शेतक-यांनी ऑनलाईन नोंदणी केली असतानाही केवळ १०४ लाभार्थ्यांना मान्यता दिली असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साधारणत: ४ हजार ७ शेतक-यांची प्रकरणे प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने हिंगोली जिल्ह्यातील पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेंतर्गातील शेतकऱ्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.
हिंगोली जिल्ह्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेअंतर्गत Self Register Farmer या Tab व्दारे दि. ०४.०९.२०२० अखेर एकुण २३,८९० लाभार्थी शेतक-यांनी नोंदणी केलेली असून त्यापैकी १६,२६८ लाभार्थ्यांना मान्यता (Approve) देण्यात आलेली आहे व ५,९२९ लाभार्थ्यांची मान्यता नाकारण्यात (Reject) आलेली आहे. तसेच सद्यस्थितीत तालुका Login मध्ये उपलब्ध असलेल्या १,६९३ लाभार्थ्यांना नियमानुसार पात्र किंवा अपात्र आहेत याबाबत तहसील कार्यालय व तलाठी यांच्यामार्फत सदर कागदपत्रे तपासुन नियमानुसार मान्यता देण्याची कार्यवाही निरंतर चालु आहे
(२) व (३) पात्र खातेदारांना मान्यता देण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर झालेले आहे. तसेच उर्वरीत पात्र लाभार्थी यांची मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेंतर्गतची तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत**

**(७) १४९८ (०३-०४-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र पुरस्कृत पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेंतर्गत काही तांत्रिक अडचणीमुळे राज्यातील लाखो शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेच्या लाभासाठी आधार कार्ड अनिवार्य करण्यात आले असल्यामुळे अनेक शेतक-यांचे आधारकार्ड बँक खात्याशी सलग्न नसल्यामुळे हजारो शेतकरी सदरहू योजनेच्या लाभापासुन वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन सदरहू योजनेतील तांत्रिक अडचणी दूर करण्यासह या योजनेपासुन वंचित असलेल्या शेतक-यांना लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरु झाल्यानंतर सुरुवातीला लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्यांनी सादर केलेली सदोष माहिती (खातेधारक नाव, बँक खाते नंबर, आय.एफ.सी.कोड इ. विसंगती) किंवा माहिती चुकीची अपलोड झाल्याने PFMS मधील काही तांत्रीक अडचणींमुळे तसेच दि. ०१ डिसेंबर २०१९ नंतर पात्र लाभार्थ्यास वितरीत करण्यात येणारे सर्व हप्ते आधार लिंक आधारीतच करण्यात आल्यामुळे काही शेतकरी या योजनेतील लाभापासून वंचित राहिल आहेत.

तथापि, तांत्रिक बाबींचा पुर्तता करून सर्व पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी आवश्यक कार्यवाही क्षेत्रिय स्तरावरून सुरु आहे.

(२) अंशत: खरे आहे.

राज्यातील दि.०५ सप्टेंबर २०२० अखेर १,०९,५०,०९७ लाभार्थ्यांनी पी.एम.किसान पोर्टलवर नोंदणी केलेली आहे. त्यापैकी १,०७,३८,०९२ लाभार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण पुर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत २,१२,००५ लाभार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण करण्याची कार्यवाही क्षेत्रीयस्तरावर सुरु आहे.

(३) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचे संपूर्ण कामकाज हे पी.एम. किसान पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने सुरु असल्यामुळे माहिती दुरुस्त करण्याचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**सांगलीमध्ये नशेत बेधुंद असलेल्या तरुणांनी चारचाकी गाड्या पेटवून दिल्याबाबत**

**(८) १६५१ (२२-०३-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली येथील १०० फूटी रस्त्यावर नशेत बेधुंद असलेल्या ७ तरुणांनी दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास मध्यरात्री परिसरातील दोन चारचाकी गाड्या पेटवून देऊन दहा चारचाकी गाड्यांची तोडफोड केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व या प्रकरणी किती जणांना अटक केली तसेच दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२७-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) दि.०१/०१/२०२० रोजी बेकायदेशीर जमाव जमवुन स्कॉर्पीओ गाडी पुर्णपणे जाळुन व इतर १० चारचाकी गाड्यांच्या काचा दगडाने फोडून खाजगी गाड्यांचे व सार्वजनिक रोडचे एकूण २,८७,०००/- रुपयांचे नुकसान केले प्रकरणी सांगली शहर, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ०२/२०२० भा.दं.वि.सं. कलम ४३५, ४३६, ४२७, १४७, १४८, १४९ सह सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम १९८४ (दुरुस्थी २०१५) चे कलम ३, ४ अन्वये दि. ०१/०१/२०२० रोजी ७ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर ७ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील होमगार्डना मानधन देण्याबाबत**

**(९) २०६५ (२२-०३-२०२०). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.गणेश नाईक (ऐरोली), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती**

**सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने परिपत्रक क्र.मस/कार्या-२/२०१९/९६० नुसार होमगार्डच्या पुनर्नोंदणीसाठी अट क्र.५ मध्ये होमगार्डचे वय ५० व ५५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पुरुषांसाठी ५ मिनिटांत ८०० मीटर तर महिलांसाठी ३ मिनिटांत ४०० मीटर धावणे ही शारीरिक चाचणी पूर्ण करण्याची अट घातली असून राज्यातील १५ हजार होमगार्ड यांना मानधन देण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याने त्यांच्या सेवा स्थागित करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, होमगार्डला वर्षात किमान १८० दिवस (५० टक्के) रोजगार उपलब्ध करुन देण्याचे दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी होमगार्ड विभागाने पत्रक काढले असून या पत्रकानुसार राज्यातील होमगार्डला १८० दिवस बंदोबस्ताची सेवा देणे गरजेची असतानाही होमगार्ड विभागाने १० जानेवारी, २०२० रोजी काढलेल्या पत्रकानुसार निधी उपलब्ध नसल्याने कायमस्वरुपी बंदोबस्तास ५० टक्के स्थगिती देण्यात यावी अशा सूचना दिल्यामुळे होमगार्डवर रोजगाराचे संकट आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ४२ हजार होमगार्ड यांचे मागील पाच महिन्यांपासून १३७ कोटी ८३ लाखाचे मानधन प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सेवेतून कमी केलेल्या होमगार्डना पुन्हा सेवेत घेऊन होमगार्डचे थकीत मानधन देण्याबाबत तसेच ५० व ५५ वर्षे पूर्ण झालेल्या होमगार्डना शारीरिक चाचणीची घातलेली अट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२६-१०-२०२०) :** (१) व (२) शासनाने होमगार्डचा कर्तव्य कालावधी त्यांच्या मागणीनुसार ५५ वर्षे वरुन ५८ वर्षे एवढा वाढवीला आहे. होमगार्ड हे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणेसोबत कर्तव्य बजावत असतात. त्यामुळे होमगार्ड हे शारिरीक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. म्हणून, नमुद अट घातली आहे.

होमगार्डच्या भत्त्यात प्रतिदिन रु.३००/- वरून रु.५७०/- केलेली वाढ त्याचप्रमाणे त्यांना वर्षातील किमान ६ महिने कर्तव्य देण्याचे नियोजन करावे असा निर्णय शासनाने घेतला त्यामुळे होमगार्ड करिता अर्थसंकल्पीत केलेली रु १३६ कोटी तरतूद पूर्ण खर्च झाल्याने पोलीस घटकांना कायमस्वरुपी कर्तव्यावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या होमगार्डच्या सेवा तात्पुरत्या स्थगित करण्यात आल्या आहेत. मात्र कायदा व सुव्यवस्थेकरिता पोलीस महासंचालक,

महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मागणी प्रमाणे होमगार्ड कर्तव्यावर तैनात करण्यात येत आहेत. होमगार्डच्या मानधनासाठी अतिरीक्त निधीची मागणी मान्य करण्यात आली आहे. थकीत मानधन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

(४) होमगार्ड संघटनेतील होमगार्डचा कर्तव्य कालावधी ५५ वर्षेचा होता, तो ५८ वर्षे केला आहे. तसेच होमगार्डच्या पुनर्नोंदणीबाबत चे पूर्वीचे सर्व आदेश रद्द केले आहेत. होमगार्ड वयाच्या ५० व ५५ व्या वर्षी पूढील ३ वर्षाकरीता पुनर्नोंदणी करताना पुरुषांसाठी ८०० मीटर ५ मिनिटात धावणे आणि महिलांसाठी ४०० मीटर ३ मिनिटात धावणे ही शारीरीक चाचणीची शुल्लक अट घातली आहे. तथापी, होमगार्ड हे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणेसोबत कर्तव्य बजावत असतात. त्यामुळे होमगार्ड हे शारिरीक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. म्हणून होमगार्डचे वय वर्ष ५० व ५५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांची शारिरीक पात्रता आजमाविण्यात यावी, असा निर्णय घेतला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांचे खाते आधार लिंक नसल्याने शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(१०) २०७० (२०-०३-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांचे खाते आधार लिंक नसल्यामुळे शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्मान योजना, कर्जमाफी, दुष्काळ व अन्य शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधार कार्ड बँक खात्यासोबत लिंक करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(३) असल्यास, जिल्हानिहाय एकूण शेतकऱ्यांपैकी किती शेतकऱ्यांचे आधार लिंक करण्यात आले व किती शेतकऱ्यांचे आधार लिंक करणे बाकी आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत PM-KISAN पोर्टलवर नोंदविण्यात येणारे नाव आधार प्रमाणित असणे केंद्र शासनाने बंधनकारक केलेले आहे. त्यास अनुसरुन चिखली तालुक्यातील एकुण ४८०३५ इतक्या पात्र शेतकऱ्यांपैकी एकुण ४५८४८ इतक्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण करण्यात आले असुन उर्वरीत एकुण २१८७ इतके पात्र लाभार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## बुलढाणा जिल्हयातील गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत प्रलंबित असलेले प्रस्ताव

**(११) २०८० (०३-०४-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत शेकडो प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना अपघात विमा योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत सदरहू योजनेत किती प्रस्ताव प्राप्त झाले असुन किती प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१२-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) दि.१०.८.२०२० अखेर पर्यंत बुलढाणा जिल्हयांतील सन २०१७-१८ मध्ये एकूण ११२ विमा प्रस्ताव प्राप्त होते त्यापैकी ८३ विमा प्रस्ताव मंजूर केले असून २० विमा प्रस्ताव नामंजूर केले आहेत आणि ८ प्रस्ताव कागदपत्रांच्या अभावी प्रलंबित असून १ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहे.

तसेच सन २०१८-१९ मध्ये एकूण १२६ विमा प्रस्ताव प्राप्त होते त्यापैकी ३७ विमा प्रस्ताव मंजूर केले असून ०१ विमा प्रस्ताव नामंजूर केला आहे आणि ६६ प्रस्ताव कागदपत्रांच्या अभावी प्रलंबित असून २२ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहे.

(३) सदर योजनेतंर्गत विमा प्रस्ताव हे शेतकरी कुटुंबाकडून आवश्यक असणा-या कागदपत्राच्या पुर्ततेअभावी प्रलंबित राहतात. बहुतांशी प्रकरणामध्ये ७/१२, ६-क, ६-ड, व्हिसेरा अहवाल, पोलीस अंतिम अहवाल इत्यादी कागदपत्रा अभावी विमा प्रकरणे प्रलंबित राहतात, असे निदर्शनास आलेले आहे.

प्राप्त विमा प्रस्ताव शीघ्र गतीने मंजूर होण्यासाठी जिल्हा स्तरावर तसेच आयुक्तालय स्तरावर विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी यांच्या समवेत बैठक घेऊन सातत्याने विमा प्रकरणे निकाली काढण्यास्तव सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच त्याबाबत सातत्याने पाठपुरावा चालू आहे. तसेच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावर कागदपत्राच्या पुर्ततेसाठी कार्यवाहीत असलेल्या विमा प्रस्तावाची पुर्तता तात्काळ करुन घेऊन विमा कंपनीकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहेत. तसेच योजनेच्या संनियंत्रणासाठी तालुका स्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा स्तरावर मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समित्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

---

## चिखली, मेहकर, बुलढाणा (जि.बुलढाणा) या तालुक्यांमध्ये पंतप्रधान कृषी सिंचन योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१२) २०९४ (२०-०३-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली, मेहकर, बुलढाणा (जि.बुलढाणा) या तालुक्यांमध्ये पंतप्रधान कृषी सिंचन योजनेत गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, उक्त तालुक्यांत पंतप्रधान कृषी सिंचन योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२२-१०-२०२०) :** (१) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेच्या प्रति थेंब अधिक पीक घटकांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सुक्ष्म सिंचन योजनेमध्ये घोटाळा झाल्याचे वृत्त दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये दि.१६.१२.२०१९ ते दि.२१.१२.२०१९ या कालावधीमध्ये प्रसिद्ध झाले होते. त्याचप्रमाणे स्वाभिमानी शेतकरी संघटना, बुलढाणा यांनी दि.१९.१२.२०१९ रोजी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बुलढाणा यांना निवेदन दिले होते.

(२) प्रस्तुत प्रकरणी उप विभागीय कृषि अधिकारी बुलढाणा, मेहकर व खामगाव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समित्या नेमून प्राप्त निवेदनानुसार जिल्हयातील सर्व तालुक्यातील रॅण्डम पध्दतीने १०% गावांची तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये योजनेची अंमलबजावणी, योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करण्यात आल्याचे दिसून आले.

(३) चौकशीमध्ये घोटाळा झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत देण्यात येणारी अनुदानाची रक्कम नियमित मिळत नसल्याबाबत

**(१३) २५२८ (२०-०३-२०२०). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत देण्यात येणारी मदतीची रक्कम अनेक शेतकऱ्यांना मिळाले नसुन संकेत स्थळावर बघितले असता हप्ता राज्य शासनाकडून अडवला असल्याचे निदर्शनास येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने मदतीचे हफ्ते अडवले आहेत काय, नसतील तर त्या संकेत स्थळावर येणाऱ्या संदेशाचा अर्थ काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना मदतीची रक्कम तात्काळ वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
पी.एम.किसान पोर्टलवरील लाभार्थ्यांचा डेटा NIC व PFMS या दोन्हीस्तरावरून मान्य झाल्यानंतर NIC दिल्ली कडून लाभ वितरीत करण्यासाठी बॅचेस च्या स्वरूपात उपलब्ध झालेल्या डेटाची जिल्हास्तरावर अंतिम पडताळणी केल्यानंतर लाभार्थ्यांचे नाव, बँक खाते क्रमांक, IFSC क्रमांक इ. मध्ये विसंगती आढळल्यामुळे जिल्हास्तरावरुन केलेल्या विनंतीच्या आधारे तसेच PFMS मधील काही तांत्रीक अडचणींमुळे Payment Stop केलेल्या लाभार्थ्यांच्या Status मध्ये “payment stoped by state” असा संदेश दिसतो. असा संदेश दिसणा-या लाभार्थ्यांचा डेटा NIC दिल्ली कडून जिल्हास्तरावर पुनश्च: दुरुस्तीसाठी उपलब्ध करून देण्यात येतो. त्यानंतर या लाभार्थ्यांच्या डेटा मध्ये जिल्हास्तरावरून दुरुस्ती केली जाते. पुन्हा हा डेटा सर्व प्रक्रियेमधून जाऊन त्या लाभार्थ्यांना Payment Release केले जाते.

सबब राज्य शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत देण्यात येणारे मदतीचे हप्ते कायमस्वरुपी अडवले नसुन ते लाभार्थ्यांच्या माहितीमधील त्रुटींची पुर्तता होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात लाभ थांबविण्यात येतो.
(३) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचे संपूर्ण कामकाज हे पी.एम. किसान पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने सुरु आहे. ज्या शेतकऱ्यांचा लाभ त्रुटीमुळे थांबविण्यात आलेला आहे त्या शेतकऱ्यांच्या माहितीमधील त्रुटींची दुरुस्ती तात्काळ करण्यासंदर्भात जिल्हास्तरीय नोडल अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांना दुरचित्रवाणी परिषदेमार्फत सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विरूर (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) पोलीस स्टेशन अंतर्गत**
**पोलीसांकडून मारहाणीमुळे केलेली आत्महत्या**

**(१४) २६४२ (२२-०३-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरूर (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) पोलीस स्टेशन अंतर्गत कार्यरत पोलीस अधिकारी वा कर्मचारी यांनी नागेश बतमेकलावर नामक व्यक्तीला बेदम मारहाण केल्याने वेदना असह्य झाल्यामुळे त्यांनी दिनांक १९ जानेवारीच्या रात्री आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागेश बतमेकलावर यांच्या मृत्यूस जबाबदार पोलीस अधिकारी वा कर्मचारी यांची चौकशी करून त्यांचेवर कारवाई करण्याबाबतचे निवेदन जिल्हा पोलीस अधिक्षक यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून नागेश बतमेकलावर यांना मारहाण करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२२-१०-२०२०) :** (१) नाही, हे खरे नाही.
नागेश बतमेकलावर यास एका व्यक्तीसह त्यांचे वाहनात विदेशी दारु पकडल्याने त्यांचेविरुध्द क्र.६५ (अ), म.दा.का. अन्वये गुन्हा नोंदवून दि.१५.०१.२०२० रोजी अटक करण्यात आली. तद्नंतर मा.न्यायालयाने त्यांना जामीनावर सोडले होते. दरम्यान त्यांनी न्यायालयामध्ये पोलीसांनी मारहाण केली नसल्याचे सांगितले होते. तद्नंतर सदर इसम हा त्यांचे गांवी तेलंगना येथे मरण पावल्याचे पोलीसांना माहिती मिळाली आहे.
(२) निवेदन प्राप्त झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोळंबा (ता.दिग्रस, जि.यवतमाळ) ग्रामपंचायत येथे मग्रारोहयो अंतर्गत झालेला गैरप्रकार**

**(१५) २८५२ (१४-०४-२०२०). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोळंबा (ता.दिग्रस, जि.यवतमाळ) ग्रामपंचायत येथे सन २०१६ मध्ये मग्रारोहयो अंतर्गत काम न करता देयके काढण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशी अहवालात सरपंच यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याबाबत शिवाजी देशमुख व गावक-यांनी दिनांक १८ ऑक्टोंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सरपंच हे ग्रामपंचायतीचे प्रमुख या नात्याने या घोटाळयाबाबत अनभिज्ञ होते काय, तसेच उपजिल्हाधिकारी रोहयो कार्यालयात यवतमाळ येथून सरपंचाचे नाव वगळण्यासाठी खोडाखोड करण्यात आली काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने गैरप्रकार करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१४-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) दोषीविरुध्द गुन्हा दाखल - कारवाई सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पीक विमा संदर्भातील अडचणी दूर करण्याबाबत**

**(१६) ३००४ (२०-०३-२०२०). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यात नुकत्याच झालेल्या परतीच्या पावसाने शेतक-यांच्या सोयाबीन, कापूस, ज्वारी व खरीप पिकांचे नुकसान झाल्यामुळे पीक नुकसान भरपाईसाठी विमा कंपनीकडे अर्ज करण्यासाठी शेतकरी कृषी कार्यालयासमोर गर्दी करीत असल्याचे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्जासोबत नुकसानभरपाईचा अर्ज, विमा भरलेली पावती, आधारकार्ड, सातबारा, बँक पासबुक आदि कागदपत्रे सोबत जोडावी लागत आहे, वास्तविक सदरहू शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे यापूर्वीच जोडून सादर केली असतांनाही पुन्हा ही कागदपत्रे का मागविण्यात येत आहेत,

(३) तसेच, प्रशासनाकडून विमा संदर्भात दखल घ्यायला कोणीच तयार नसुन याबाबत विचारणा केली असता ते विमा कंपनीचे वेबसाईट अन क्रमांक देत असुन हा फोन लागत नसल्याने वेबसाईटवर काय करायचे याचीही आवश्यक माहिती मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अर्धापूर तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पीक विमा अर्जा संदर्भातील अडचणी दूर करण्यासह पिकांची नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१२-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

विमा संरक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांनी नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना देण्यासाठी या कालावधीत कार्यालयात शेतकरी अर्जदार मोठ्या प्रमाणात आले होते.

(२) पुर्व सुचना अर्ज सादर करताना शेतकऱ्यांमार्फत पिक विमा भरलेली पावती सादर केल्यास उर्वरित कागदपत्रांची आवश्यकता नसते, तथापि पिक विमा भरलेली पावती सादर न केल्यास उर्वरित (आधार कार्ड, सातबारा, बँक पासबुक इ.) कागदपत्रे अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

(३) हे खरे नाही.

(४) अर्धापूर (जि. नांदेड) तालुक्यातील २१६२३ शेतकरी अर्जदारांनी रक्कम रु. १.४१ कोटी विमा हप्ता भरुन १५७१३.७४ हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. त्यापैकी २०५३० अर्जदार शेतकऱ्यांना रक्कम रु. १५.८५ कोटी इतकी नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनीमार्फत पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

___

## नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांप्रमाणे योजनांचा लाभ देण्याबाबत

**(१७) ३०७० (०७-०४-२०२०). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ दिला जातो, परंतु, नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांप्रमाणे कोणत्याही योजनांचा लाभ दिला जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण व शहरी असा भेदभाव निर्माण करून नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांवर शासन अन्याय करीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांप्रमाणे योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासनाचे धोरणानुसार केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना या दोन योजनांमध्ये नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांना लाभ देण्यात येत नाही. कृषि विभागाच्या इतर सर्व योजनांमध्ये नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांप्रमाणे लाभ देण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील मजूरांना गावात काम मिळण्याबाबत

**(१८) ३३४२ (१४-०४-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यात परतीच्या पावसामुळे शेती पिकांचे नुकसान होवुन उत्पन्नात घट तसेच ग्रामीण भागात मजूरांना काम नसल्यामुळे मजूर मुंबई-पुण्याकडे मोठया संख्येच्या प्रमाणात रवाना होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उमरखेड तालुक्यातील मजूरांना गावात काम मिळण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१४-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) उमरखेड तालुक्यात मनरेगाअंतर्गत १७७ कामे सुरू असून ६२४० मजुरांना कामे पुरविली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राळेगाव, कळंब (जि.यवतमाळ) तालुक्यातील कृषी अधिकारी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) ३३५२ (२०-०३-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव, कळंब (जि यवतमाळ) तालुक्यातील कृषी अधिकारी कार्यालयातील तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी सहायक इत्यादी संवर्गातील पदे रिक्त असल्यामुळे शेतकऱ्यांना विविध योजनेची माहिती मिळण्यास व काम होण्यास विलंब होत असल्याबाबतचे निवेदन दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तालुक्यातील प्रत्येकी एका कृषी सहायकाकडे ७ ते ८ गावाचे प्रभार देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राळेगाव, कळंब येथील कृषी अधिकारी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

यवतमाळ जिल्हयातील राळेगाव तालुका कृषि अधिकारी कार्यालयात एकूण ५० पदे मंजूर असून त्यापैकी २५ पदे भरलेली तर २५ पदे रिक्त आहेत. तसेच कळंब तालुक्यातील ५० मंजूर पदांपैकी ३० पदे भरलेली असून २० पदे रिक्त आहेत. तथापि, या दोन्ही कार्यालयांमध्ये रिक्त असलेली बहुतांश पदे ही लिपीकवर्गीय संवर्गाची असून तांत्रिक संवर्गाची पदे ही जवळपास भरलेली आहेत.

(२) यवतमाळ जिल्हयातील राळेगाव तालुक्यात कृषि सहाय्यकांची एकूण २५ पदे मंजूर असून त्यापैकी १८ पदे भरलेली तर ०७ पदे रिक्त आहेत. तसेच कळंब तालुक्यातील कृषि सहाय्यकांच्या २५ मंजूर पदांपैकी २२ पदे भरलेली असून ०३ पदे रिक्त आहेत.

(३) शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी मुख्यत: कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी ही पदे महत्वाची आहेत. सदरची पदे मुख्यत: भरण्यात आलेली असून कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, म.कृ.से गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील रिक्त असणारी पदे भरण्याबाबत उचित कार्यवाही विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती तसेच कृषि आयुक्तालय व शासन स्तरावर करण्यात येत आहे. तसेच रिक्त असणाऱ्या पदांचा कार्यभार इतर अधिकारी / कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात आलेला असून त्यांच्यामार्फत

शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देण्याबाबत वेळोवेळी सूचना करण्यात येत आहे. लिपीक संवर्गामधील पदे ही वित्त विभागाने पदभरतीवरील निर्बंध उठविल्याशिवाय भरता येणार नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माजलगाव (जि.बीड) तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयातीत रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२०) ३४८१ (२०-०३-२०२०). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माजलगाव (जि.बीड) तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात कृषी सहायकांची एकूण ३७ पदे मंजूर असुन त्यापैकी १५ पदे रिक्त व कृषी सहायक ५ ते ७ वर्षापासुन विना परवानगी गैरहजर आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार माजलगाव तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील रिक्त पदे भरुन विना परवानगी गैरहजर असणाऱ्या ३ कृषी सहायक यांच्या विरूध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१), (२) व (३) बीड जिल्हयातील माजलगाव तालुक्यात कृषि सहाय्यकांची एकूण ३७ पदे मंजूर असून त्यापैकी २२ पदे भरलेली तर १५ पदे रिक्त आहेत. तसेच ०३ कृषि सेवक विना परवानगी गैरहजर आहेत.

अनधिकृत गैरहजर असणाऱ्या एका कर्मचाऱ्याच्या सेवा विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद यांचे आदेश दि.०१/०२/२०२० अन्वये सेवा समाप्त करण्यात आलेल्या आहेत व अनधिकृत गैरहजर असलेल्या दुसऱ्या कर्मचाऱ्याच्या सेवा समाप्ती बाबत कार्यवाही सुरु असून लवकरच त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येणार आहे.

तसेच गैरहजर असलेले अन्य एका कृषि सेवकाने सेवेचा राजीनामा दिल्यामुळे त्यांचा राजीनामा आदेश दि.२९/०१/२०२० अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील शेतकऱ्यांना पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(२१) ३७९३ (०४-०४-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील**

**(धुळे ग्रामीण), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील शेतकऱ्यांना केंद्र शासनाच्या पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे दिनांक २० नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला मात्र दुसऱ्याच दिवशी त्यांच्या बँक खात्यावरील रक्कम काढून घेण्यात आली असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अमरावती जिल्हयातील शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१४-१०-२०२०) :** (१) होय हे अंशतः खरे आहे,

अमरावती जिल्हयातील दिनांक ०५.०९.२०२० अखेर एकुण ३,२१,१०५ नोंदणी केलेल्या लाभार्थांपैकी २,७६,५१८ लाभार्थ्यांना पहिला हप्ता, २,७०,२७६ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता, २,५१,९४२ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता, १,६८,१५७ लाभार्थ्यांना चौथा हप्ता, १,४६,२१६, लाभार्थ्यांना पाचवा हप्ता, व ७९,१०७ लाभार्थ्यांना सहावा हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे. उर्वरीत पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय हे अंशतः खरे आहे,

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी या योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थ्याच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी) द्वारे जमा होते. योजना जाहीर झाल्यानंतर फेब्रुवारी ते मार्च २०१९ च्या दरम्यान शिघ्र गतीने लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचा लाभ देण्याची मोहीम शासनस्तरावर घेण्यात आली. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी स्वत:चे बचत बँक खाते किंवा जनधन योजने अंतर्गत उघडण्यात आलेल्या बँक खाते देणे आवश्यक आहे. परंतु बऱ्याच शेतक-यांचे खाते नंबर मध्ये विसंगती आढळल्याने सदरच्या चुकीच्या बँक खात्यात जमा झालेली पहिल्या हप्त्याच्या लाभाची रक्कम परत काढून घेण्यात आली. असे अमरावती जिल्हयातील एकुण ३,८७५ लाभार्थ्यांच्या बाबतीत प्रकार घडून आला. त्यापैकी सर्व म्हणजेच ३,८७५ शेतकऱ्यांचे बँक खात्याबाबतची माहिती दुरुस्त करण्यात आलेली असून निधी वितरणाची कार्यवाही सुरु आहे. याबाबत पुनश्च असे प्रकार घडलेले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयामध्ये पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेंतर्गत बॅकेमार्फत झालेला गैरप्रकार**

**(२२) ४०३५ (०४-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये मानधन दिले जात असुन या योजनेसाठी सोलापूर जिल्हातील नाव नोंदणी केलेल्या सुमारे ५ लाख ३ हजार २ शेतकऱ्यांपैकी सुमारे २ लाख ३ हजार १४७ शेतकऱ्यांच्या नावात चुका आढळल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ८३ हजार शेतकऱ्यांची नावे बँकेनी नामंजूर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने बँकमार्फत चालणाऱ्या गैर कारभाराची चौकशी करुन संबंधित दोंषीविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान योजने अंतर्गत सोलापूर जिल्हयामध्ये आज दि.५.०९.२०२० अखेर एकूण ६,०९,९५६ लाभार्थ्यांची नोंदणी झाली असून ५,९८,४०० लाभार्थ्यांची माहिती त्यांचे आधार कार्डवरील नावाप्रमाणे दुरुस्त करण्यात आली असून उर्वरीत ११,५५६ लाभार्थ्यांची माहिती त्यांचे आधार कार्डवरील नावाप्रमाणे दुरुस्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात अपघातग्रस्त शेतकऱ्यांना विमा योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(२३) ४०६१ (०४-०४-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना मृत्यू/अपंगत्व आल्यास विमा लाभ मिळवण्यासाठी गोपिनाथ मुंडे शेतकरी आपघात विमा योजना राबिवण्यासाठी कोणत्या विमा कंपन्यांची नियुक्ती करण्यांत आली असुन विमा योजना राबविण्याचे निकष काय आहेत,

(२) असल्यास, शेतकऱ्यांचा अपघाताने मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास विमा भरपाई देण्याबाबत विमा कंपन्या दिरंगाई करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहमदनगर जिल्हयात सुमारे २३० प्रस्ताव प्रलंबित असून ७७ प्रस्तावात अनावश्यक त्रुटी दाखवून रद्द केले आहेत, हे ही खरे काय,

(४) असल्यास, अहमदनगर जिल्हयात अपघातग्रस्त शेतकऱ्यांना विमा योजनेचा लाभ मिळण्यासह दिरंगाई करणाऱ्या विमा कंपन्यांवर शासनाने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१२-१०-२०२०) :** (१) गोपिनाथ मुंडे अपघात विमा योजना सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये दि ओरिएंन्टल इन्शुरंन्स कंपनी लि. मार्फत राबविण्यात आलेली असून सन २०१९-२० मध्ये सदर योजना राबविण्याकरिता दि.युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कं.लि. या विमा कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील महसुल नोंदी नुसार खातेदार असलेला शेतकरी व त्याचे कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले १ व्यक्ती (आई-वडील,पती/पत्नी,मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती ) असे एकूण २ जणांना योजनेंतर्गत विमाछत्र प्रदान करण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०१७-१८ मध्ये महाराष्ट्रात एकूण ३५४५ प्रस्तावांपैकी २५५१ प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून ७१० प्रस्ताव नामंजूर करण्यात आले आहेत.तसेच १५१ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत असून १३३ प्रस्ताव कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी प्रलंबित आहेत.

सन २०१८-१९ मध्ये महाराष्ट्रात एकूण ३८२९ प्रस्तावांपैकी १७३८ प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून ३५७ प्रस्ताव नामंजूर करण्यात आले आहेत.तसेच ७०९ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत असून १०२५ प्रस्ताव कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी प्रलंबित आहेत.

(३) हे खरे नाही.

दि.२१.८.२०२० अखेर पर्यंत अहमदनगर जिल्हयांतील सन २०१७ १८ मध्ये एकूण २८२ विमा प्रस्ताव प्राप्त होते त्यापैकी १९७ विमा प्रस्ताव मंजूर केले असून ७९ विमा प्रस्ताव नामंजूर केले आहेत व कागदपत्रांअभावी १ विमा प्रस्ताव प्रलंबित असून ५ विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत.

सन २०१८-१९ मध्ये एकूण २८८ विमा प्रस्ताव प्राप्त होते त्यापैकी १८१ विमा प्रस्ताव मंजूर केले असून २६ विमा प्रस्ताव नामंजूर केले आहेत व कागदपत्रांअभावी ४८ विमा प्रस्ताव प्रलंबित असून ३३ विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत.

(४) होय, विमा कंपनीच्या असमाधानकारक कामकाजाबाबत सातत्याने विमा कंपनीचा आढावा घेऊन आवश्यक त्या कार्यवाहीचे निर्देश दिलेले आहेत.

(५) सदर योजनेतंर्गत विमा प्रस्ताव हे शेतकरी कुटुंबाकडून आवश्यक असणा-या कागदपत्राच्या पुर्ततेअभावी प्रलंबित राहतात. बहुतांशी प्रकरणामध्ये ७/१२, ६-क, ६-ड, व्हिसेरा अहवाल, पोलीस अंतिम अहवाल इत्यादी कारणांचे कागदपत्रा अभावी विमा प्रकरणे प्रलंबित राहतात, असे निदर्शनास आलेले आहे.

प्राप्त विमा प्रस्ताव शीघ्र गतीने मंजूर होण्यासाठी जिल्हा स्तरावर तसेच आयुक्तालय स्तरावर विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी यांच्या समवेत बैठक घेऊन सातत्याने विमा प्रकरणे निकाली काढण्यास्तव सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच त्याबाबत सातत्याने पाठपुरावा चालू आहे. तसेच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावर कागदपत्राच्या पुर्ततेसाठी कार्यवाहीत असलेल्या विमा प्रस्तावाची पुर्तता तात्काळ करुन घेऊन विमा कंपनीकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहेत. तसेच योजनेच्या संनियंत्रणासाठी तालुका स्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा स्तरावर मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समित्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

---

**बाळदी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे वन विभागात**
**रोजगार हमी योजनेंतर्गत झालेले गैरव्यवहार**

**(२४) ४१४४ (१६-०४-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळदी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे वन विभागात रोजगार हमी योजनेंतर्गत अनघड दगडीबांधाचे बोगस काम केले असून अंदाजपत्रक असतांना केवळ बांध करुन बांधाची रक्कम हडप करणे तसेच कामावर बोगस ई मस्टर मजूर दाखवून स्थानिक मजूरांच्या नावे रक्कम घेवुन गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२०-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी सहा वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा) यांच्यामार्फत चौकशी झाली आहे. सदर चौकशी अहवालामध्ये निदर्शनास आलेल्या बाबींबाबत महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ चे अंतर्गत संबंधितांवर दोषारोप पत्र दाखल करण्याबाबत कार्यवाही होत आहे, सदर दोषारोप पत्र सादर होताच संबंधितांवर प्रचलित शासन नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.पो.दत्त्ताणे (ता.शिरपूर, जि.धुळे) येथील हर्षवर्धन राजेंद्र पाटील**
**या मुलाची हत्या झाल्याबाबत**

**(२५) ४२१२ (२४-०३-२०२०). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.दत्त्ताणे (ता.शिरपूर, जि.धुळे) येथील हर्षवर्धन राजेंद्र पाटील हा मुलगा बेपत्त्ता झाल्याची तक्रार त्यांच्या कुटुंबियांनी शिरपूर पोलीस स्टेशनमध्ये दिनांक २६ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने पोलीसांनी त्याचा तपास लावण्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे सदर मुलाचा दिनांक २ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास तापी नदीत मृतदेह सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खून प्रकरणी पोलीसांनी चौकशी करुन आरोपीला अटक केली आहे काय व सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे तसेच बेपत्ता मुलाचा शोध घेण्याकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित पोलीस अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२७-१०-२०२०) :** (१) मयत हर्षवर्धन राजेंद्र पाटील हा दि.२६/०४/२०१९ रोजी घरी परत आला नाही म्हणून श्री. राजेंद्र पाटील यांच्या तक्रारीवरुन दि.२७/०४/२०१९ रोजी शिरपुर शहर, पोलीस ठाणे येथे मिसींग र. नं.४४/२०१९ दाखल करण्यात आली.

(२) उक्त प्रकरणी मिसींग तक्रारीच्या अनुषंगाने तपास अंमलदार यांनी तात्काळ चौकशी सूरू केली. मिसींगचा तपास सुरु असताना दि.०२/०५/२०१९ रोजी कमखेडा शिवारातील तापी नदी पात्रात त्याचा मृतदेह मिळून आले प्रकरणी नरडाणा, पोलीस ठाणे, अ.मृ.र.नं. १६/२०१९ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे दाखल आहे.

(३) तपासात निष्पन्न वस्तुस्थिती नुसार मयत हर्षवर्धन याने काहीतरी नैराश्यातुन तापी नदीच्या पाण्यात उडी मारुन आत्महत्या केलेली आहे. मयत याचा घातपात कुणी केला अगर तसेच करण्याचे कारण चौकशीत निष्पन्न झालेले नाही. मिसींग चौकशी अगर अ. मृ. चौकशीत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी बेपत्ता मुलाचा शोध घेण्याकडे कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष केलेले नाही. योग्य पद्धतीने व सखोल चौकशी करण्यात आलेली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**पारोळा (जि.जळगांव) तालुक्यात चोरी, लुटमार, दरोडयाचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(२६) ४२१३ (२४-०३-२०२०). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) तालुक्यात चोरी, लुटमार, दरोडा इत्यादी घटनाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारोळा बसस्थानकावर दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास एका विद्यार्थ्याच्या खिशातून १२ रुपये चोरीला गेले तसेच पेंढारपुरा येथील ज्ञानेश्वर यशवंत महाजन यांच्या घरातून दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास ९० हजार रुपयांची चोरी झाल्याची तक्रार पारोळा पोलीस स्थानकात दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक पोलीसांनी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या चोरांना पकडून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली तसेच तालुक्यातील चोरी, लुटमार व दरोड्याच्या घटनावर प्रतिबंध आणण्यासाठी शासनाने कोणती सक्षम यंत्रणा उभारली आहे वा याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२७-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) दि.१३/०१/२०२० रोजी पारोळे (जि.जळगांव) शहरातील बस स्थानक परीसरात गर्दीमध्ये समाधान मिस्तरी यांचे खिशातील रु.११,८००/- रु. अज्ञात आरोपीने चोरल्या प्रकरणी पारोळा, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ०४/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात दोन आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली असुन गुन्हा तपासावर आहे.

दि.०८/०१/२०२० रोजी ज्ञानेश्वर यशवंत महाजन यांच्या घरामध्ये ८९८९०/- रुपयांची चोरी झाले प्रकरणी पारोळा, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ०२/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशा घटना घडू नयेत म्हणून अभिलेखावरील क्रियाशील गुन्हेगारांवर देखरेख ठेवण्यात येत आहे. रात्रीची रात्र गस्त केली जात आहे. महत्वाचे मार्ग व महामार्गावर सक्तीची दरोडा प्रतिबंध गस्त समवेत स्थानिक गुन्हे शाखेकडे ए.डी.एस. पथकामार्फत कारवाई केली जाते.

(५) विलंब झालेला नाही.

---

**पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील कृषी विभागातील असलेली रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२७) ४२१४ (२०-०३-२०२०). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या एकूण मंजूर ६७ पदांपैकी ३५ पदे रिक्त असल्याचे एरंडोल येथे झालेल्या समन्वय समितीच्या बैठकीत दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पदे रिक्त असल्यामुळे शेतक-यांना विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पारोळा तालुक्यातील कृषी विभागातील सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

पारोळा तालुक्यातील कृषि विभागातील ६७ मंजूर पदांपैकी ३३ पदे भरलेली असून ३४ पदे रिक्त आहेत.

(२) शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी मुख्यत: कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी ही पदे महत्वाची आहेत. सदरची पदे मुख्यत: भरण्यात आलेली असून कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, म.कृ.से गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील रिक्त असणारी पदे भरण्याबाबत उचित कार्यवाही विभागीय कृषि सहसंचालक तसेच कृषि आयुक्तालय व शासन स्तरावर करण्यात येत आहे. तसेच रिक्त असणाऱ्या पदांचा कार्यभार इतर अधिकारी / कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात आलेला असून त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देण्याबाबत वेळोवेळी सूचना करण्यात येत आहे.

(३) कृषि सेवक भरती-२०१९ प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना नियुक्ती देताना जळगाव जिल्ह्यातील पदे भरण्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. लिपीक संवर्गातील पदभरतीवर निर्बंध असल्यामुळे तुर्तास सदरची पदे भरता येणार नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील कृषि विभागात व अधिक्षक कार्यालयात असलेली रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२८) ४२८७ (२०-०३-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील कृषि विभागात एकूण २७० पदे तसेच कृषी अधिक्षक कार्यालयात कृषी सहायकांची एकूण ६५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदे रिक्त असल्यामुळे उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांवर अतिरिक्त कामाचा ताण येत असुन शेतक-यांसाठी विविध योजना राबविताना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सांगली जिल्हयातील सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सांगली यांचे अधिनस्त जिल्ह्यातील विविध कार्यालयांत ७८६ पदे मंजूर असून त्यापैकी ५२४ पदे भरलेली तर २६२ पदे रिक्त आहेत. तसेच जिल्ह्यात कृषि सहाय्यकांची ३६२ पदे मंजूर असून त्यापैकी ३१० पदे भरलेली तर ५२ रिक्त पदे आहेत.

(२) शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी मुख्यत: कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी ही पदे महत्वाची आहेत. सदरची पदे मुख्यत: भरण्यात आलेली असून रिक्त असणाऱ्या पदांचा कार्यभार इतर अधिकारी / कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात आलेला असून त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देण्याबाबत वेळोवेळी सूचना करण्यात येत आहे.

(३) कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, म.कृ.से संवर्गातील रिक्त असणारी पदे भरण्याबाबत उचित कार्यवाही विभागीय कृषि सहसंचालक तसेच कृषि आयुक्तालय व शासन स्तरावर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील कृषी कार्यालयामधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२९) ४९३५ (०४-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील कृषी कार्यालयामध्ये मंजुर पदापैंकी तालुका कृषी अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची ३० पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यात सिंचन क्षेत्र अवघे अकरा टक्के असून शेतकरी कोरडवाहू पिके घेतात, कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारच्या अद्यावत तंत्रज्ञानाची माहिती मिळत नसल्याने शेतकऱ्यांना पारंपारिक पिकेच घ्यावी लागत असून त्यामुळे एकेरी उत्पादनात वाढ होत नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील कृषी कार्यालयामधील उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१) हे अंशतः खरे आहे.

हिंगोली जिल्हयातील सेनगाव तालुका कृषि अधिकारी कार्यालयात एकूण ६७ पदे मंजूर असून त्यापैकी ४१ पदे भरलेली तर २६ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी मुख्यतः कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी ही पदे महत्वाची आहेत. सदरची जास्तीत जास्त पदे मुख्यतः भरण्यात आलेली असून कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, म.कृ.से गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील रिक्त असणारी पदे भरण्याबाबत उचित कार्यवाही विभागीय कृषि सहसंचालक तसेच कृषि आयुक्तालय व शासन स्तरावर करण्यात येत आहे. तसेच रिक्त असणाऱ्या पदांचा कार्यभार इतर अधिकारी / कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात आलेला असून त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ व आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याबाबत वेळोवेळी सूचना करण्यात येत आहे. तसेच उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे कृषि विभागाच्या योजना जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. लिपीक संवर्गामधील पदे ही वित्त विभागाने पदभरतीवरील निर्बंध उठविल्याशिवाय भरता येणार नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर शहरात निर्मल इन्फ्रा होम कॉर्पोरेशन लि. कंपनीने ग्राहकांची केलेली फसवणूक

**(३०) ५१२४ (२५-०३-२०२०). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरात निर्मल इन्फ्रा होम कॉर्पोरेशन लि. कंपनीने रक्कम दाम दुप्पट करण्याचे आमिष दाखवून सात लाख रुपयांची फसवणूक केल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सदर घटनेचा तपास केला आहे काय,
(३) असल्यास, तपासानुसार सदर आरोपींवर कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२७-१०-२०२०) :** (१) सोलापूर शहरात निर्मल इन्फ्रा होम कॉर्पोरेशन लि. कंपनीने फसवणूक केलेची बाब ही सन २०१२ ते २०१७ या कालावधीत घडलेली आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी विजापूर नाका, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४६७/२०१७ भा.दं.वि.सं. कलम ४०९, ४२०, १२० (ब) व एमपीआयडी कायदा कलम ३ व ४ प्रमाणे दि.०८/०८/२०१७ रोजी गुन्हा दाखल केला असून सदरचा गुन्हा २८/०८/२०१७ रोजी आर्थिक गुन्हे शाखा येथे वर्ग करण्यात आलेला आहे. तसेच मोहोळ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५३३/२०१७ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ५०४, ३४ व एमपीआयडी कायदा कलम ३ व ४ प्रमाणे दि.२९/०७/२०१७ रोजी गुन्हा दाखल आहे.

उपरोक्त दोन्ही गुन्ह्यातील निष्पन्न आरोपीतांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात आलेली आहे. सोलापूर शहर हद्दीत दाखल गुन्ह्यातील आरोपीतांनी कंपनीत गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांच्या रक्कमेतून खरेदी केलेली स्थावर मालमत्ता संरक्षित करण्यात आलेली आहे. उपरोक्त दोन्ही गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**मोखाडा (जि.पालघर) येथील दुर्गम भागात कृषी अधिकारी पद भरण्याबाबत**

**(३१) ५७०० (०५-०४-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा (जि.पालघर) येथील दुर्गम भागात कृषी अधिकारी पद रिक्त असल्याने शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत असुन कायमस्वरुपी कृषी अधिकारी नसल्यामुळे सदर कृषी कार्यालयात गैरव्यवहार चालू असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार जव्हारचे कृषी अधिकारी यांचेकडे देण्यात आल्याने सदर भागात कमालीचे असंतोषाचे व नाराजीचे वातावरण पसरलेले असून कायमस्वरुपी कृषी अधिकारी देण्यात यावा याबाबत तेथील ग्रामस्थांनी मा.कृषी मंत्री यांचेकडे निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत सदरहू पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-१०-२०२०) :** (१), (२) व (३) तालुका कृषि अधिकारी, मोखाडा कार्यालयातील तालुका कृषि अधिकारी हे पद रिक्त आहे. तथापि भ्रष्टाचाराबाबत तक्रारी प्राप्त नाहीत. तसेच महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील कृषि अधिकारी, ताकृअ कार्यालय, मंडळ कृषि अधिकारी, मोखाडा व मंडळ कृषि अधिकारी, खोडाळा ही पदे भरण्यात आली आहेत. रिक्त असणाऱ्या पदांचा कार्यभार इतर अधिकारी / कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात आलेला असून त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देण्याबाबत वेळोवेळी सूचना करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर शहरातील सलगर वस्ती पोलिस ठाण्यात फिर्यादीला मारहान केल्याबाबत

**(३२) ५७१४ (२७-०३-२०२०). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील सलगरवस्ती पोलिस ठाण्यात पोलिसांना माहिती देतो का असे म्हणत रजाक गफुर शेख रमजान गफुर शेख (राहणार थोबडे वस्ती) यांच्यावर फिर्यादीला पोलीस स्टेशन मध्येच मारहान केल्यामुळे गुन्हा नोंद झाल्याची माहीती दिनांक ६ जानेवारी रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस स्टेशन मध्येच फिर्यादीला मारहाण करणाऱ्या आरोपींवर कोणता गुन्हा नोंद झाला आहे व गुन्हयाचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, त्यानुसार त्यांच्यावर कोणती कठोर कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. अनिल देशमुख (२७-१०-२०२०) :** (१) व (२) सोलापूर शहरातील सलगरवस्ती पोलीस ठाण्यात आरोपीकडुन फिर्यादीस मारहाण झाली नसुन फिर्यादीचे थोबडेवस्ती देगांवनाका येथील ऑफिसमध्ये झाली आहे. सदरबाबत सलगरवस्ती, पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ०६/२०२० भा.दं.वि.सं. कलम ३०७, २९४, ३३६, ४२७, ४५२, ५०६, ३४ व आर्म अक्ट कलम ४/२५ व महा. पोलीस अधि. १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करुन गुन्हयाचे दोषारोपपत्र दो.प.क्र.१७/२०२० दि.१६/०३/२०२० रोजी मा.न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

---

### उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांना पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेचा लाभ देण्याबाबत

**(३३) ५७३९ (०५-०४-२०२०). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यात पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेसाठी किती शेतकरी पात्र असुन याबाबत तालुका निहाय आकडेवारी काय आहे,

(२) असल्यास, पात्र शेतकऱ्यांपैकी किती शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे व त्याचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, माहिती अपलोड करणे प्रलंबित असल्यामुळे या योजनेपासून अनेक शेतकरी वंचित राहिले असुन योजनेचा एकही हप्ता मिळाला नाही अशा शेतकऱ्यांची तालुका निहाय संख्या किती आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांना सदरहू योजनेचा लाभ देवुन योजनेपासुन वंचित ठेवणाऱ्या जिल्हयातील तहसिलदार यांचेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१२-१०-२०२०)** : (१) पी.एम. किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत दिनांक १४/०८/२०२० अखेर उस्मानाबाद जिल्ह्यातील एकुण २,८४,६८३ शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली असुन त्यापैकी २,७९,६६३ लाभार्थी पात्र आहेत. उर्वरीत ५०२० नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांची पात्रतेच्या निकषाप्रमाणे पडताळणी करुन त्यांच्या नोंदणीस मान्यता देणे किंवा नाकारणे याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील दिनांक १४/०८/२०२० अखेर तालुकानिहाय पात्र लाभार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| उस्मानाबाद | ५२,८५६ |
| तुळजापुर | ४९,६८४ |
| उमरगा | ३५,९४१ |
| लोहारा | १७,९८२ |
| भूम | ३०,४८३ |
| परंडा | ३५,९५५ |
| कळंब | ३७,६८१ |
| वाशी | १९,०८१ |
| एकुण | २,७९,६६३ |

(२) उस्मानाबाद जिल्ह्यातील दिनांक १४/०८/२०२० अखेर एकुण २,७९,६६३ पात्र लाभार्थीपैकी २,७८,१४० लाभार्थ्यांना पहिला हप्ता, २,७३,९९१ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता, २,५९,७२२ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता, २,१२,३७१ लाभार्थ्यांना चौथा हप्ता, १,८२,८९७ लाभार्थ्यांना पाचवा हप्ता व १,००,५३७ लाभार्थ्यांना सहावा हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे.

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) योजना सुरु केली आहे. केंद्र शासनाकडील दि.०७ जून २०१९ चे पत्रानुसार सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबीयास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे ३ हप्त्यात रू. ६०००/- प्रती वर्षी लाभ देण्यात येत आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

पी.एम.किसान योजने अंतर्गत शेतकऱ्यांना पी.एम.किसान पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करण्याची सुविधा केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिली असल्याने त्या शेतकऱ्यांची माहिती अपलोड करण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याने या योजनेपासुन असे लाभार्थी वंचित राहिले नाहीत.

उस्मानाबाद जिल्ह्यातील एकुण १२,२५४ लाभार्थ्यांना त्रुटी पुर्ततेअभावी पी.एम.किसान सन्मान निधी या योजनेचा एकही हप्ता मिळाला नाही. या लाभार्थ्यांच्या त्रुटी पुर्तता करण्याच्या सुचना जिल्हास्तरावर नोडल अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या असुन अशा लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

तालुकानिहाय एकही हप्ता न मिळालेल्या लाभार्थींची संख्या खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| उस्मानाबाद | १८७१ |
| तुळजापुर | १८१७ |

| | |
|---|---|
| उमरगा | १२३२ |
| लोहारा | १०६१ |
| भूम | २१५४ |
| परंडा | २५२२ |
| कळंब | ५१३ |
| वाशी | १०८४ |
| एकुण | १२,२५४ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## युद्धजन्य तसेच आपत्कालीन परिस्थितीत सर्वसामान्य नागरिकांना सतर्कतेचा इशारा देणारे भोंगे बंद असल्याबाबत

**(३४) ५८८५ (२७-०३-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युद्धजन्य तसेच आपत्कालीन परिस्थितीत सर्वसामान्य नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यासाठी मुंबईत सन १९६२ मध्ये बसविण्यात आलेल्या ३०६ पैकी १६८ भोंगे बंद पडले असल्याचे तर उर्वरित १३८ भोंगे केवळ दिखाऊ असल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरी संरक्षण दलाकडून स्वयंसेवक घडवले जात नसल्याने दिखाऊ बनलेल्या भोंग्यांची दर महिन्याला केली जाणारी चाचणी बंद असून शासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने अद्ययावत तंत्रज्ञानाअभावी सन २००४ पासून या भोंग्याची स्वयंचलित यंत्रणा पूर्णपणे बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई हे शहर नेहमीच दहशतवाद्यांच्या निशाण्यावर असल्याने दहशतवादी किंवा हवाई हल्ल्यादरम्यान मोबाइल व इतर यंत्रणा बंद पडत असल्याने नागरिकांना सतर्क भोंगे करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकणारे सदरहू भोंगे तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१९-१०-२०२०)** : (१) मुंबई सह राज्यात ठाणे, पुणे, नाशिक, उरण, तारापूर याठिकाणी नागरी संरक्षण दलातील सायरन आहेत. सर्व ठिकाणी एआरपी (एअर रेड प्रिकॉशन) यंत्रणा कालबाह्य झाल्याने सर्व भोंगे एकत्रित वाजत नाहीत. परंतु बृहन्मुंबईसह इतर सर्व ठिकाणी असलेले भोंगे वेतनीक कर्मचा-याद्वारे हस्तचलित वाजविले जातात. एआरपी यंत्रणा कालबाह्य झाल्याने तत्कालीन संचालकांच्या आदेशानुसार बृहन्मुंबईतील १७८ भोंगे गोदामात ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी ५ भोंगे पुन्हा कार्यान्वीत करण्यात आले आहेत. १३३ भोंगे टॅपिंग पध्दतीने आजतागायत Stand alone mode वर चालू आहेत. काढलेले भोंगे जेथे शक्य आहे त्या ठिकाणी टॅपिंग पध्दतीने बसविण्याचे काम सुरू आहे.

(२) व (३) सध्या चालु असलेले १३३ भोंगे नागरी संरक्षण दलातील वेतनीक कर्मचा-याद्वारे हस्तचलित वाजविले जातात. भोंग्याचे स्वयंचलित यंत्रणा २००४ पासून कालबाह्य झाल्याने नवीन यंत्रणा कार्यान्वित करण्याचे काम हाती घेतलेले आहे. दरम्यानच्या कालावधीत MTNL आणि BSNL या केंद्र शासकीय आस्थापनांबरोबर वेळोवेळी सायरन वाजविण्याकरीता चर्चासत्रे व बैठका आयोजित करण्यात आल्या असून, अद्याप सदर दोन्हीही आस्थापनांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने, अद्याप सदरहू यंत्रणा स्वयंचलितरित्या कार्यान्वित होऊ शकली नाही. यासाठी संचालक, नागरी संरक्षण, मुंबई यांचेकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे जुन्या वाहनांची खरेदी-विक्री करणारे ओएलएक्स डॉटकॉम संकेतस्थळ तयार करुन नागरिकांची केलेली फसवणुक**

**(३५) ६७०९ (२७-०३-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे जुन्या वाहनांची खरेदी-विक्री करणारे ओएलएक्स डॉटकॉम संकेतस्थळ तयार करुन नागरिकांची फसवणुक होत असल्याचा प्रकार माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संकेतस्थळावरुन ऑनलाईन ट्रान्झॅक्शनच्या माध्यमातुन लाखो रुपयांनी नागरिकांची फसवणुक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये सनदी अधिकारी वा लष्करी अधिकारी पदावर असल्याचे भासवुन बदली दुस-या राज्यात झाली अशी बतावणी करुन सदरचे वाहन विकत असल्याचे देखिल भासवुन नागरिकांची फसवणुक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार चौकशीत दोषी आढळुन आलेल्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. अनिल देशमुख (१६-१०-२०२०) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

ओएलएक्स डॉटकॉम संकेत स्थळ नव्याने तयार करून नागरिकांची फसवणूक झाल्याबाबतची नोंद आढळून आली नाही.

परंतु ओएलएक्स ऑन लाईन खरेदी विक्री करणाऱ्या संकेत स्थळावरून नागरिकांना जुन्या गाड्या, टेबल, सोफा सेट, फर्निचर अशा वस्तू विकण्याचे तसेच खरेदी करण्याचे आमिष दाखवून गुगल पे, फोन पे च्या माध्यमातून क्यूआर कोड स्कॅन करायला सांगून अथवा यु.पी.आय. रिक्वेस्ट ॲक्सेप्ट करायला सांगून फसवणुकीने बँक खात्यातील पैसे चोरी झाल्यावरून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) होय, हे खरे आहे. नाशिक शहर येथून प्राप्त माहितीनुसार लष्करी अधिकारी असल्याचे भासवून विश्वासार्हता प्राप्त करून अशाप्रकारे दोन प्रकरणात फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) व (५) सदर प्रकरणी गुन्ह्याचा तपास चालू आहे. फसवणूकीबाबत दाखल झालेल्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने तपास करताना युपीआयच्या पेमेंटच्या माध्यमातून गेलेल्या रकमा फिर्यादीस परत मिळण्याच्या अनुषंगाने संबंधित बँक/कंपन्या/ई वॉलेट कंपन्यांना मेल करण्यात आले व इतर माहिती घेण्यात आली. तपासादरम्यान निदर्शनास आले की, अशा प्रकारचे गुन्हे परराज्यातून मुख्यत्वे करून भरतपूर/भिलवाडा, राजस्थान येथून होत आहेत. आरोपीचे नाव व व्यवसाय अद्याप उघडकीस आलेला नाही. गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा सायबर तंत्रज्ञानानिशी व सर्व प्रयत्नांनीशी शोध चालू आहे.

---

## नाशिक जिल्ह्यातील शेतक-यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंचा लाभ मिळण्याबाबत

**(३६) ७२७५ (०५-०४-२०२०). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना मदतीचा हात मिळावा या उद्देशाने स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८-१९ या वर्षामध्ये नाशिक जिल्ह्यातील १३० शेतक-यांचा अपघाती मृत्यू झाला असून त्यांना या योजनेंचा लाभ मिळण्यासाठी मृत पावलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांनी शासनाकडे नोंद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शेतक-यांच्या कुटुंबियांना अद्यापही शासनाकडून कोणतीच मदत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नाशिक जिल्हयात सदरहू योजनेची प्रभाविपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१४-१०-२०२०) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सन २०१८-१९ च्या दि.१०.८.२०२० रोजीच्या अहवालानुसार नाशिक जिल्ह्यामध्ये एकूण १९१ विमा प्रस्ताव प्राप्त झाले होते. यापैकी १२५ विमा प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून ११ विमा प्रस्ताव नामंजूर करण्यात आले आहेत तसेच सद्यस्थितीत विमा कंपनीकडे ४२ विमा प्रस्ताव कार्यवाहीत असून १३ विमा प्रस्ताव कागदपत्रांच्या अभावी प्रलंबित आहेत.

(४) प्राप्त विमा प्रस्ताव शीघ्र गतीने मंजूर होण्यासाठी जिल्हा स्तरावर तसेच आयुक्तालय स्तरावर विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी यांच्या समवेत बैठक घेऊन सातत्याने विमा प्रकरणे निकाली काढण्यास्तव सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच त्याबाबत सातत्याने पाठपुरावा चालू आहे. तसेच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावर कागदपत्राच्या पुर्ततेसाठी कार्यवाहीत असलेल्या विमा प्रस्तावाची पुर्तता तात्काळ करुन घेऊन विमा कंपनीकडे

मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहेत. तसेच योजनेच्या संनियंत्रणासाठी तालुका स्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा स्तरावर मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समित्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(५) सदर योजनेतंर्गत विमा प्रस्ताव हे शेतकरी कुटुंबाकडून आवश्यक असणा-या कागदपत्राच्या पुर्ततेअभावी प्रलंबित राहतात. बहुतांशी प्रकरणामध्ये ७/१२, ६-क, ६-ड, व्हिसेरा अहवाल, पोलीस अंतिम अहवाल इत्यादी कारणांचे कागदपत्रा अभावी विमा प्रकरणे प्रलंबित राहतात, असे निदर्शनास आलेले आहे.

---

**वडगाव (ता.केज, जि.बीड) येथे आदिवासी पारधी जमातीतील एका कुटुंबातील तिघांची हत्या केल्याबाबत**

**(३७) ९५९० (२९-०५-२०२०). श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मांगवडगाव (ता.केज, जि.बीड) येथे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान आदिवासी पारधी जमातीतील पवार कुटुंबातील तिघांची हत्या करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार दोषी आढळलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२७-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन युसुफ वडगाव ता. केज जि. बीड येथे गु.र.नं.१०६/२०२० कलम १४३, १४७, १४८, १४९, ३०२, ३०७, ४३५, ४२७, १२० (ब), भागवी सह कलम १८४ मोवाका सह ४, २५ शस्त्र अधिनियम सह ३(१)(g), ३(२)(va), ३(२) (पाच) अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा अन्वये एकूण १४ आरोपीतांविरूध्द दिनांक १४.०५.२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील चौदा ही आरोपीतांना अटक करण्यात आलेली असून ते सध्या न्यायालयीन कोठडी मध्ये आहेत. १४ आरोपीतां विरूध्द मा. अपर सत्र न्यायालय अंबाजोगाई येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव (मुंबई) येथील आरे वसाहतीतील आदिवासी पाड्यांना जोडणारे रस्ते मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग करण्याबाबत**

**(३८) १००६२ (२८-०५-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (पूर्व) येथील ३१६२ एकरच्या वन क्षेत्रात २७ आदिवासी पाडे असून, विविध ४६ ठिकाणी बिगर आदिवासी वास्तव्यास आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे येथील दिनकर देसाई मार्ग हा ७.५ किलो मीटरचा मुख्य रस्ता मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३०६ अंतर्गत महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरेमधील विविध पाड्यांना जोडणारे ४५ कि. मी. चे अंतर्गत रस्ते मुंबई महानगरपालिकाकडे हस्तांतरित करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ व दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना तसेच सन २०११ पासून आजपर्यंत अनेक लेखी निवेदने शासनास सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनांवर शासनाने कोणती कार्यवाही केली व त्याचा तपशील काय आहे,

(५) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद रस्ते मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व सदरहू अंतर्गत रस्ते मुंबई महानगरपालिकेकडे किती कालावधीत वर्ग करण्यात येणार आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२६-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) आरे दुग्ध वसाहतीअंतर्गत रस्ते हे खास आदिवासी पाड्यांसाठी जोडणारे नसून सदरचे अंतर्गत रस्ते हे तबेल्यातील जनावरांपासुन उत्पादित होणारे दूध वाहनांव्दारे बाहेर घेऊन जाण्यासाठी तसेच तबेल्यामध्ये व शासकीय निवासस्थानांमध्ये येण्या-जाण्या करीता विविध गटांना (तबेल्यांना) जोडणारे अंतर्गत रस्ते आहेत.

सदरचे अंतर्गत रस्ते शासनाच्या दूग्ध व्यवसाय विकास विभागाच्या मालकीच्या जागेत असुन याअंतर्गत रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीचे काम हे कार्यकारी अभियंता, सा.बा.विशेष प्रकल्प विभाग, आरे यांच्या कार्यालयास प्राप्त होणाऱ्या अनुदानातुन वेळोवेळी केले जातात.

सदर वस्तुस्थिती लक्षात घेता आरे दुग्ध वसाहती अंतर्गत रस्ते महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) निरंक.

---

## सहकारी दूध संघ व खाजगी दुध पुरवठा धारक यांना अनुदान देण्याबाबत

**(३९) ११४३७ (११-०७-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.मानसिंग नाईक (शिराळा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिरिक्त दुधाची खरेदी करून भुकटी तयार करण्याची योजना शासनाने राबविली परंतु सहकारी दूध संघांना शासनाकडुन सुमारे १०० कोटीपेक्षा जास्त अनुदान देय असल्यामुळे सहकारी दूध संघ व खाजगी दुध पुरवठा धारक यांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दहा लाख लिटर दुधाची खरेदी करण्याचे आव्हान देऊन प्रत्यक्षात ८ लाख लिटरच्या आत दुधाची खरेदी केली तसेच दुधापासून पावडर व बटर तयार केले असता त्याला भाव नसल्यामुळे कोट्यवधी रुपयांचे पावडर साठे पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात दूध पावडरचे साठे पन्नास हजार टनपर्यंत गेले असून विविध डेअरी प्रकल्पातील साठ्यांमध्ये किमान दोन लाख टन पावडर देशात उपलब्ध असताना केंद्र शासनाने दहा हजार टन दूध पावडरच्या आयातीला मान्यता दिल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आर्थिक संकटात असलेल्या सहकारी दूध संघ व खाजगी दुध पुरवठा धारक यांना अनुदान देवुन त्यांचे पुनरुज्जीवन करण्यासह दुध पावडर विक्री व्हावी याकरिता उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२६-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर योजनेअंतर्गत स्विकृत केलेल्या दूधामार्फत निर्मित केलेल्या दुध भूकटीचा विनियोग "डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना" या योजनेअंतर्गत करण्यात येणार असून त्याबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच या योजनेअंतर्गत निर्माण झालेल्या सर्व देशी कुकींग बटरची विक्री करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण व्हावे असे शासनाचे धोरण व दृष्टिकोन असल्याने शासनाने राज्यातील अतिरिक्त होणाऱ्या दुधापैकी १० लक्ष दुधाची स्विकृत करण्याची योजना दि.०३/०४/२०२० व दि.२७/०४/२०२० या शासन निर्णयान्वये प्रथमत: ४ महिने व तद्नंतर दि. २७/०८/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये २ महिन्याकरीता योजना राबवली आहे.

सहकार तसेच खाजगी दुग्ध व्यवसाय क्षेत्र आपल्या स्तरावर व्यावसायिक धोरण ठरवित असल्याने शासनाने सदर क्षेत्रात थेट हस्तक्षेप करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(४०) ११८०९ (११-०७-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे**

**(हडपसर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राजेश पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोवीड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या कालावधीमध्ये शासनाने २५ रुपये दराने शेतकऱ्यांकडून दुध खरेदी करण्याबाबत निर्देश दिले असताना केवळ सरकारी दुध संस्थाकडून ३.५ फॅट व एसएनफ ८.५ साठी २५ रुपये दर देण्यात येत असून खाजगी दुध संघाकडून प्रतिलिटर २० ते २२ रुपये दराने दुध खरेदी केले जात असल्याने दुध उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणत नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे इत्यादी मुख्य महानगरे कोरोना विषाणूचा हॉटस्पॉट ठरली असल्यामुळे दुधाची विक्री कमी होऊन दुध उद्योगांचे दररोज ३५ लाख लिटर दुध व्यर्थ जात असताना दुधाचा कमी झालेला दर तसेच पशुखाद्यांचे वाढलेले दर यामुळे शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहमदनगर जिल्हा दुध उत्पादनात आघाडीवर असून प्रतिदीन २२ ते २३ लाख लिटर दुधाचे उत्पादन होत असून लॉकडाऊनमुळे दुधाची उत्पादने विक्री करणारी दुकाने बंद झाल्याने शेतकऱ्यांना प्रतिलिटर २० ते २२ रुपये दर मिळू लागल्याने दुधाचा कमी झालेला दर व पशुखाद्यांचे वाढलेले दर यामुळे इतक्या कमी दरात दुधाची विक्री करणे शेतकऱ्यांना परवडत नसल्याने प्रतिदिन दुध उत्पादकांना साडेतीन कोटीचा तोटा सहन करावा लागत आहे,हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मुसळपाडा वाकी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील शेतकऱ्यांनी प्रत्येक शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रतिलिटर दहा रुपये अनुदान द्यावे तसेच जेनेरिक औषधांच्या निर्यातीच्या बदल्यात अमेरिकेतून दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या आयातीवर परवानगी देण्याचा घेतलेला निर्णय रद्द करावा अशा मागणींसाठी दिनांक १ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दुध उत्पादक शेतकऱ्यांचे हजारो लिटर दुध व्यर्थ जाऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याने आर्थिक मदत तसेच मोफत पशु खाद्य देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली असून पूर्वीप्रमाणे दुधाला योग्य दर न दिल्यास आंदोलन करण्याचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत चौकशी करुन खाजगी दुध संस्थांकडून शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य दर देण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त दुध उत्पादक शेतकऱ्यांना मोफत पशुखाद्य व नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२६-१०-२०२०) :** (१) कोविड-१९ या रोगामुळे होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण देशात दि. २३ मार्च, २०२० पासून लॉकडाऊन घोषित करण्यात आला होता. या लॉकडाऊन मुळे राज्यातील दूध व दुग्धजन्य पदार्थाच्या मागणीत मोठ्या प्रमाणात घट

झाल्यामुळे अतिरिक्त द्रवरूप दूधाची स्थिती राज्यात उद्भवली होती. अशा परिस्थितीत दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हितास्तव शासनाने राज्यातील एकूण अतिरिक्त दूधापैकी १० लक्ष लिटर मर्यादेपर्यंत दूध स्वीकृत करून सदर दुधाचे रूपांतरण दूध भुकटी व बटरमध्ये करण्याची योजना दिनांक ३ एप्रिल, २०२० व दिनांक २७ एप्रिल, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये घोषित केली होती. सदर योजनेअंतर्गत दूध स्विकृती केवळ सहकारी दूध संघ व शासन या यंत्रणेकडून करण्यात येऊन ३.५/८.५ या गुणप्रतीच्या दुधास प्रतिलिटर रुपये २५/- असा दर देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

वरील योजनेत खाजगी क्षेत्राचा समावेश करण्यात आला नसल्याने खाजगी दूध क्षेत्राकडून त्यांनी निश्चित केलेल्या दराप्रमाणे दुध खरेदी दर दिला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) शासनाने घोषित केलेल्या योजनेअंतर्गत स्वीकृत केलेल्या दुधास रुपये २५/- प्रति लिटर असा दर देण्यात आला आहे. राज्यातील खासगी दुग्ध प्रकल्पांनी त्यांच्याकडील दूध हे पिशवी बंद दूध स्वरूपात व दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती करून विक्री केली आहे. तसेच उर्वरित दूधाचा पुरवठा इतर खाजगी दूध भुकटी प्रकल्पांकडे केला असल्यामुळे राज्यातील दूध विक्रीविना पडुन राहील्याचे  निदर्शनास येत नाही.

(३) अहमदनगर जिल्हयामध्ये माहे जानेवरी-२०२० मध्ये शासन, सहकार व खाजगी दूध संघ यांचे माध्यमातून २४.५२ लाख लिटर दूधाचे संकलन झालेले आहे. माहे जुन २०२० मध्ये जिल्हयातील प्रतिदिन दूध संकलन २७.६९ लाख लिटर इतके झाले आहे. जानेवारी महिन्याच्या तुलनेत सदर संकलन ३.१७ लाख लिटर वाढले असल्याचे दिसून येते.

तथापि संकलित होणाऱ्या दुधाचा विनियोग पिशवीबंद दूध ठोक विक्री करुन अतिरिक्त दुधाचे दूध भुकटी मध्ये रुपांतर केले जात आहे. सहकारी दूध संघामार्फत दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर रुपये २५/- दर दिला जात आहे. परंतु काही खाजगी दूध प्रकल्पामार्फत शेतकऱ्यांना प्रति लिटर कमी दुध खरेदी दर देण्यात येत असल्यामुळे त्याचा परिणाम दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर होत असतो.

(४) व (५) होय.

दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुधास योग्य दर प्राप्त व्हावा यासाठी राज्यातील अतिरिक्त होणा-या दूधापैकी १० लक्ष लिटर दुधाची स्विकृती करुन सदर स्विकृत दुधास दि. २७ ऑगस्ट, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.२५/- प्रतिलिटर असा दर दिला आहे. खाजगी दुग्ध व्यवसायिक क्षेत्रावर सद्यस्थितीत कायदेशीररित्या बंधन आणण्याची कोणतीही तरतुद उपलब्ध नसल्याने खाजगी व्यावसायिक आपल्या स्तरावर दुधाची खरेदी विक्री करित असतात.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिखली (जि. बुलढाणा) तालुक्यातील पिकांवर मर रोगाचा व हरभऱ्यावर गाठे अळीचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(४१) १२५५८ (१२-०८-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात मका व हरभऱ्याची मोठ्या प्रमाणात लागवड केली असता ह्या पिकांवर मर रोगाचा व हरभऱ्यांवर गाठे अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिकांवर मर रोगाचा व हरभऱ्यांवर गाठे अळीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी शासनाने केली आहे काय,त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१२-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

सन २०१९-२० मध्ये बुलडाणा, ता.चिखली मध्ये मका व हरभरा पिकाची सरासरी पेरणी क्षेत्राच्या अनुक्रमे ४९.९९ व ५६५.६२ टक्के क्षेत्रावर पेरणी झालेली आहे.

चिखली तालुक्यात हरभऱ्यावर इसोली व जांभरुन या दोन गावांमध्ये मर रोगाचा तर करवंड, वाघापूर, साकेगाव, बोराळा, माळशेंबा व भालगाव या ६ गावांमध्ये गाठे अळी रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला.
(२) पेरणीपुर्वी चिखली तालुक्यामध्ये कृषि सहायकामार्फत २६० गाव बैठका व शास्त्रज्ञांच्या ६ प्रक्षेत्र भेटी इ. विस्तारविषयक कार्यक्रमातून मर रोग व घाटे अळी येऊ नये म्हणून बीज प्रक्रियासंदर्भात प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन प्रत्येक गावात करण्यात आले. परिणामी मर रोगासंदर्भात जनजागृती झाल्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या खाली ठेवण्यात यश आले.

तसेच पेरणीनंतर तालुक्यामध्ये हरभऱ्यावरील घाटेअळी संदर्भात एकात्मीक पीक व्यवस्थापन हरभऱ्यावरील शेतीशाळा, किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प माध्यमातून कृषि सहायक व कृषि पर्यवेक्षक यांच्या मार्फत ५६ गावांमध्ये नियमीत निरीक्षणे घेण्यात आली. त्याअंतर्गत तालुक्यातील ६ गावांमध्ये रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला. परंतू सदर गावांमध्ये तत्काळ प्रतिबंधात्मक उपाय घेऊन प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यात आला.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खेड (जि.पुणे) तालुक्यातील आंबेठाण येथून मुरूम उपसा होत असलेबाबत

**(४२) १३२४४ (१३-०९-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील एमआयडीसी पुणे टप्पा क्रमांक ५ साठी संपादित केलेल्या गट क्रमांक ८१२ या भूखंडावरील आंबेठाण येथून अवैधरीत्या महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने मुरूम उपसा माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या ताब्यातील भुखंडातून मुरूम काढला जात असताना खेड महसूल विभाग जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मुरूम चोरी  प्रकरणांमध्ये शासनाने कोणत्या स्वरूपाची कारवाई केली वा करत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१८-०९-२०२०) :** (१), (२) व (३) मौजे आंबेठाण, ता.खेड, जि.पुणे येथील जमीन गट क्र.८१२ या क्षेत्रापैकी १०५.६० हे.आर.क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे नांवे वर्ग आहे. सदर जमीनीवर पोकलेन मशीनद्वारे गौण खनिजाचे उत्खनन सुरु असल्याचे संबंधित क्षेत्रीय अधिकारी यांनी केलेल्या स्थळपाहणीमध्ये दि.२४/६/२०२० रोजी दिसून आले आहे. सदर प्रकरणी म्हाळुंगे पोलीस ठाणे येथे दि.२५/६/२०२० रोजी पोकलेन चालक व मालक व अन्य एक संबंधित व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पोकलेन मशीन जप्त करण्यात आली आहे. उक्त ठिकाणी झालेल्या गौण खनिजाबाबत तहसिलदार, खेड यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ चे कलम ४८(७) नुसार संबंधितांना रु.४४,१९,८००/- इतक्या दंडात्मक रक्कमेची नोटीस दि.२/७/२०२० रोजी बजावली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारोळा, एरंडोल, भडगाव व इतर तालुक्यातील (जि.जळगाव)**
**शेतकरी ठिबक सिंचन अनुदानापासून वंचित राहिलेबाबत**

**(४३) १३२६५ (१४-०९-२०२०). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रकल्प संचालक, पोकरा, मुंबई यांनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी पोकरा अंतर्गत समाविष्ट गावातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून लाभ न देता पोकरा योजनेतून पूर्वसंमती देण्याचे कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्प संचालक, पोकरा, मुंबई यांनी दिनांक ६ मे, २०२० रोजी वैयक्तिक लाभाच्या अर्जांना पूर्वसंमती न देण्याचे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठिबक सिंचन बसविण्यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना व पोकरा या दोन्ही योजनेपासून शेतकरी वंचित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पारोळा, एरंडोल, भडगाव व इतर तालुक्यांतील शेतकऱ्यांनी ऑनलाईन दाखल केलेल्या अर्जांना पूर्वसंमती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१५-१०-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) नाही.

सन २०२०-२१ करिता दोन्ही योजनांसाठी अर्ज घेण्याची सुरुवात केली आहे व नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत (PoCRA) पूर्व संमती देण्यास अनुमती दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाअंतर्गत साहित्य वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(४४) १३४७४ (१७-०७-२०२०). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालया अंतर्गत सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या कालावधीमध्ये शासनाच्या विविध योजनांमधुन मिळालेल्या निधीतुन शेतकऱ्यांना बचत गटांना कृषी अवजार व साहित्य वाटप करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, गडचिरोली यांनी नियमांना डावलून आर्थिक लाभ मिळविण्याच्या हेतूने साहित्य वाटप केले असुन पात्र लाभार्थ्यांना वगळून स्वतःच्या मर्जीतील लाभार्थ्यांना साहित्य वाटप करुन गैरप्रकार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनांसाठी अर्ज केलेल्या अर्जदारांची व त्यात पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांची यादी साहित्य वाटप करण्यापूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासून मंजूर करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने पात्र लाभार्थ्यांना साहित्य वाटप करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२६-१०-२०२०) :** (१) मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, गडचिरोली या कार्यालयास निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१८-१९ व सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये शेतकऱ्यांच्या बचत गटांना कृषी अवजारे व साहित्य वाटप करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये लाभार्थी बचत गटांची निवड जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, गडचिरोली यांच्या कार्यालयाकडून

करण्यात आली होती. हे सर्व बचत गट कृषी विभागाच्या “आत्मा (Agricultural Technology Management Agency)” व महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) या संस्थेत नोंदणीकृत आहेत.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये बचत मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत तालुका स्पेसिफिक योजनेअंतर्गत बचत गटाची निवड अंतिम करण्याकरीता उप विभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली ६ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीमार्फत लाभार्थी शेतकरी बचत गटांची निवड करण्यात आली असून; ट्रॅक्टर व अवजारे, राईस मिल, विद्युत मोटार, गवत कापणी यंत्र इ. कृषी अवजारे DBT द्वारे अनुदान वर्ग करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील फळपिकासाठी प्लास्टिक आच्छादन व शेटनेटसाठी अनुदान देण्याबाबत**

**(४५) १३६४४ (१४-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील द्राक्ष, डाळिंब, पेरू, सीताफळ या फळपिकासाठी प्लास्टिक आच्छादन व शेटनेट करण्याकरिता अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.कृषि मंत्री यांच्या समवेत स्थानिक लोकप्रतिनिधींची बैठक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त फळ पिकांसाठी प्लास्टिक आच्छादन व शेडनेट करण्याकरिता अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२१-०९-२०२०) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्लास्टीक आच्छादन या बाबीचा एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान या योजनेमध्ये समावेश करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दर्यापूर व अंजनगाव (सुर्जी) या तालुक्यांचा रासायनिक खताचा रॅक पॉइंट हा चांदूर बाजार किंवा अकोला येथे करण्याबाबत**

**(४६) १३६९४ (१४-०९-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर, अंजनगाव (सुर्जी) (जि.अमरावती) या दोन तालुक्यांला रासायनिक खतांचा पुरवठा धामणगाव रेल्वे येथील शासनाच्या रॅक पॉईंटवरुन करत असल्यामुळे दर्यापूर आणि धामनगाव रेल्वे या दोन्ही ठिकाणातील अंतर १२० की. मी असून रॅक पॉईंट व रासायनिक खत पुरवठा करणारा संबंधीत विभाग हे फक्त ७० की मी पर्यत रासायनिक खत वितरण करत असून उर्वरीत अंतराचे काम हे दर्यापूर आणि अंजनगाव (सुर्जी) तालुक्यातील संबंधीत विभागावर येत असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रॅक पॉईंट हा १२० की मी दूर असल्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर खतांचा पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दर्यापूर व अंजनगाव (सुर्जी) या तालुक्यांचा रासायनिक खताचा रॅक पॉइंट हा चांदूर बाजार किंवा अकोला येथे करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अमरावती येथे झालेल्या खरीप हंगाम आढावा बैठकीमध्ये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१५-१०-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे
(२) नाही.
(३) होय.
(४) अमरावती जिल्हयास धामणगाव रेल्वे व बडनेरा या दोन रेल्वे रेक पॉईंटवरुन खताचा पुरवठा करण्यात येतो. धामणगाव रेल्वे रेक पॉईंटवरुन दर्यापूर १०७ कि.मी. व अंजनगाव (सुर्जी) १२७ कि.मी. अंतरावर असून दोन्ही तालुक्यांना रासायनिक खताचा पुरवठा खत कंपनीकडून करण्यात येतो. परंतु दोन्ही तालुक्यांचे वाहतुकीचे अंतर जास्त असल्यामुळे खतांचा पुरवठा करण्यास अंशत: अडचणी निर्माण होत आहेत. चांदुरबाजार रेल्वे रेकपॉईंट बाबतचा प्रस्ताव मा. रेल्वे मंत्री, भारत सरकार व सीएफटीएम, पश्चिम रेल्वे यांना सादर करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सैन्य दलात शहीद झालेल्या माजी सैनिकांना मिळकत करात सवलत देण्याबाबत

**(४७) १३९१६ (१३-०९-२०२०). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सैन्य दलात शहीद झालेल्या जवानांच्या वीर माता, वीर पत्नी व माजी सैनिकांना शासन विशेष सोई सुविधा उपलब्ध करून देत असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत करातील सवलत माजी सैनिकांना मिळत नसल्याने याबाबत माजी सैनिकांकडून मागणी करण्यात आली असून अद्याप या प्रकरणी कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून माजी सैनिकांना महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत करातील सवलत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१३-१०-२०२०) :** (१) होय, खरे आहे.
(२) हे खरे नाही. नगर विकास विभागाने राज्यातील नागरी स्वराज्य संस्थामधील माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट देण्याबाबत शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.५९/ नवि-२०, दि.०९/०९/२०२० अन्वये निर्णय घेतला आहे. तसेच ग्राम विकास विभागाने ग्रामीण स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या आजी/माजी सैनिकांना मालमत्ता करातून सुट देण्याबाबत शासन निर्णय क्र.व्हीपीएम-२०२०/प्र.क्र.९३/ पंरा-४, दि.१८/८/२०२० अन्वये निर्णय घेतला आहे. कार्यवाही पूर्ण झाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाल, नागपूर येथे अवैध संस्था काढून युवकांची फसवणूक केल्याबाबत**

**(४८) १४१८३ (१३-०९-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाल, नागपूर येथील कादीर अजीम शेख यांनी दि स्काऊट गाईड ऑर्गनायझेशन नावाची अवैध संस्था काढून बेरोजगार युवकांना नोकरीचे आमिष दाखवून त्यांची कोट्यवधी रूपयांनी फसवणूक केल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून अवैध संस्थेच्या आधारे युवकांची फसवणूक करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१२-११-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
नागपूर शहर पोलीस आयुक्तालय येथील बजाजनगर पोलीस स्टेशन येथे आरोपीविरुध्द दि. २०.०३.२०१९ व दि. ३०.१२.२०१९ रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(२) पोलीस स्टेशन बजाजनगर येथे गुरनं. ३०४/१९ कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील शेतकऱ्याना युरिया खताचा पुरवठा होत नसल्याबाबत**

**(४९) १४३२० (१४-०९-२०२०). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयात युरिया खताचा पुरेसा साठा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, गोंदिया जिल्हयातील शेतकऱ्यांना युरिया खताचा साठा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१५-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) गोंदिया जिल्हयाकरीता खरीप हंगाम २०२० साठी युरीया खताचे माहे एप्रिल २०२० ते ऑगस्ट २०२० पर्यंत १८९४७ इतके आवंटन मंजूर होते. तसेच, १३७४८ इतके युरिया खत उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानखुर्द, मुंबई येथे १५ वर्षीय मुलीचे अपहरण करून बलात्कार केल्याबाबत.**

**(५०) १४६१८ (१३-०९-२०२०). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द, मुंबई येथे १५ वर्षीय मुलीचे अपहरण करून तिच्यावर धावत्या कारमध्ये बलात्कार केल्याची घटना दिनांक २९ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रकरणातील आरोपीवर ११ दिवस विलंबाने गुन्हा नोंद केल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या घटनेची फिर्याद दिनांक ३० जुलै, २०२० रोजी दिली असतानाही गुन्हा नोंद करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणातील संबंधित दोषींवर तसेच गुन्हा नोंदविण्यास विलंब लावणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अनिल देशमुख (२१-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) (३) व (४) सदर प्रकरणी बळीत मुलगी ही भयभित व मानसिक तनावाखाली असल्याने तीने उशिराने तीची चुलती हीला सांगितले व त्यांनी खात्री करून पोलीस ठाणेस संपर्क केला.

सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून मानखुर्द पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३२५/२०२० कलम ३७६, ३७६(३), ३७६ (डअ), ३५४, ३५४(अ), ३६३, ५०६ भा.द.वि. सह कलम ६, १०, १२ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये ०३ आरोपीतांविरूध्द दिनांक ०८.०८.२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील तीनही आरोपीतांना तात्काळ अटक करण्यात आलेली असून ते आजपावेतो न्यायालयीन कोठडी मध्ये आहेत. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.